**कर्तव्य बजावत असतांना प्राणघातक हल्ल्यामुळे मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत... कै.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का. तलाठी)**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन ज्ञापन क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.७६/आस्था-१०**
मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक: ३१ जुलै, २०२६

**संदर्भ**: जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे पत्र क्र.२०२४/अ-२/आस्था-५/कावि, दि.०५.०९.२०२४

**शासन ज्ञापन**:-

संदर्भाधीन पत्रान्वये जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या आस्थापनेवर तहसिल कार्यालय वसमत येथे कार्यरत असलेले कर्मचारी कै.श्री.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का.तलाठी) हे शासकीय कामकाज करीत असताना त्यांची कार्यालयात हत्या करण्यात आल्यामुळे त्यांचा दि.२८.०८.२०२४ रोजी मृत्यू झाला आहे.

२. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी कै.श्री.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का.तलाठी) हे तलाठी सज्जा आडगाव (रंजे), ता.वसमत, जि.हिंगोली येथे कर्तव्यावर असताना त्यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडल्याने त्यांच्या कुटुंबास विशेष बाब म्हणून रु.५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह दि.०५/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे.

३. कै.श्री.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का.तलाठी) हे कर्तव्यावर कार्यरत असतांना त्यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यामध्ये ते मृत्युमुखी पडल्याने त्यांच्या कुटुंबियांना विशेष बाब म्हणून रु.५०,००,०००/-(रुपये पन्नास लक्ष फक्त) इतक्या रक्कमेची आर्थिक मदत देण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे.

४. त्यानुसार जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या आस्थापनेवर तहसिल कार्यालय वसमत येथे कार्यरत असलेले कर्मचारी कै.श्री.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का.तलाठी) यांच्या नामनिर्देशित व्यक्तीस / कायदेशीर वारसास रु.५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतकी रक्कम सानुग्रह सहाय्य म्हणून प्रदान करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

५. प्रस्तुत प्रस्तावावरील खर्च खाली नमूद लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा-

"मागणी क्रमधील लेखाशीर्ष क्र १-सी .. २०५३०३६९ (अनिवार्य), उद्दीष्ट क्र .१३-कार्यालयीन खर्च"

उक्त उद्दिष्टातून श्री. पवार यांच्या कुटूंबियांना द्यावयाचा उक्त निधी आहरित करण्याकरीता विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०७३११२५९१९५४४८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.31 13:00:08 +05'30'

**(संजय र. बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
(२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
(३) मा.उपमुख्यमंत्री (राउशु, क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
(४)मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
(५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
(६) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
(७) प्रधान महालेखापाल (लेखा व परीक्षण / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
(८) महालेखापाल (लेखा व परीक्षण / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
(९ जिल्हाधिकारी, हिंगोली
(१०) जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली
(११) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
(१२) कार्यासन अधिकारी (व्यय-९ / अर्थसंकल्प-६), वित्त विभाग, मुंबई
(१३) तहसिलदार, वसमत, जि. हिंगोली
(१४) कै.श्री.संतोष देवराव पवार, ग्राम महसूल अधिकारी (तत्का.तलाठी) यांचे कुटुंबीय (जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेमार्फत)
(१५) निवडनस्ती (कार्यासन आस्था-१०)